2

151

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

# आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्त्याबाबतचा मूल्यमापन अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१

*PROCHA.DOC*

## प्रास्ताविक

महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी.एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. हे प्रमाण १६.५ % एवढे आहे. सन १९७१ च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण लोकसंख्येच्या ९.२७% एवढी लोकसंख्या आदिवासीची आहे. राज्यातील आदिवासींची वाढत जाणारी लोकसंख्या तसेच आदिवासींचे प्रश्न , समग्र समस्या यांचा आढावा व त्यादृष्टीने त्यांचा विकास इ.बाबीतून आदिवासी उपयोजना किंवा जनजाती उपयोजना या नांवाने परिचित असा कार्यक्रम शासनामार्फत आखण्यात आला. आदिवासी उपयोजना कार्यक्रमाची आखणी करतांना आखणी करण्याची गरज व त्यानुषंगाने व इतर सर्वकष गोष्टींचा विचार करण्यात आला. आदिवासी उपयोजनेची निर्मिती कशाप्रकारे झाली याचा उहापोह या संदर्भात होणे गरजेचे असल्याने त्याबाबतची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे सादर केली आहे.

आदिवासी अलग प्रकारचे लोक असून त्यांच्या विकासासाठी निराळा दृष्टीकोन ठेवणे गरजेचे आहे आणि त्या अलगतेच्या धोरणातूनच इंग्रज प्रशासनाने आदिवासींना सर्वसाधारण प्रशासनापासून दूर ठेवले होते. स्वातंत्र्यानंतर भारताने 'कल्याणकारी राज्य' धोरणाचा पुरस्कार केला व त्यानुसार राष्ट्र बांधणीचे काम करावयाचे झाल्यास जनजाती व जनजातीतर यांचा पूर्ण सहभाग असणे गरजेचे आहे असा उद्देश नजरेसमोर ठेवला गेला. परंतू हा उद्देश साध्य करतांनाच आदिवासींना त्यांच्या स्वत:च्या पध्दतीने व मार्गाने विकास करुन घेण्याची त्यांना मुभा असली पाहिजे म्हणजेच आदिवासींचा विकास साधताना त्यांच्या स्वत:च्या वेगळेपणाला बाधा न आणता आधुनिक समाजाचे लाभ त्यांना मिळाले पाहिजेत व त्यांच्या विकासासाठी योजना राबविल्या गेल्या पाहिजेत, हा विचार दृढ झाला. तथापि, वर्षानुवर्षे दारिद्रयात खितपत पडलेल्या व स्वतंत्रपणे स्वत:ची जीवनमूल्ये जपणाऱ्या आदिवासींचा परिपूर्ण विकास साधणे हे सहजसाध्य काम नसून त्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे, याची जाणीव शासनास होती, म्हणूनच सर्व क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्र शासनाने या सर्व परिस्थितीचा अतिशय सांगोपांग विचार करुन आदिवासी उपयोजना हा अत्यंत महत्वाचा कार्यक्रम आखून त्याद्वारे आदिवासींच्या विकासाची दालने खुली करण्याचा प्रयत्न केला.

सुरूवातीस पहिल्या पंचवार्षिक योजनेत सामुहिक विकास कार्यक्रम राबविण्यात आला आणि दुसऱ्या योजनेच्या अखेरीस संपूर्ण देशभर हा कार्यक्रम लागू करण्यात आला व आदिवासी क्षेत्रात तो बरोबरीने राबविण्यात

आला. तथापि, सामूहिक विकास गट योजना ही जरी बहु क्षेत्रीय असली तरी ती आदिवासींकरिता पुरेशी नव्हती. तेव्हा असे आढळून आले की, सर्वसाधारण समाज हा शैक्षणिक आर्थिक दृष्टया अधिक पुढारलेला असल्याने आदिवासी समाजापेक्षा त्याने या लाभाचा अधिक फायदा घेतला. त्यामुळे आदिवासी व उर्वरित समाज यांच्यातील विषमतेची दरी पूर्वीपेक्षा रुंदावत गेली. परिणामतः १९५४ मध्ये काही विशेष बहुउद्देशीय जनजाती विकास गटांची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर १९५६ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली आणि त्यामुळे आदिवासी विकास गट विषयक अधिक सर्वसाधारण संकल्पना मांडण्यात आली. तिसऱ्या योजनेच्या अखेरीस जवळ जवळ ५०० आदिवासी विकास गट निर्माण करण्यात आले आणि त्याखाली एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के लोकांना या योजनेत सामावून घेण्यात आले.

सर्वसाधारणपणे सामूहिक विकास कार्यक्रमात सुधारणा करुन आदिवासी विकास गट योजना तयार झाली. परंतू आदिवासी विकासात ही योजना म्हणावी तशी प्रभावी ठरली नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे आदिवासी अर्थव्यवस्थेतील प्रशासकीय व संरक्षणात्मक दृष्टीकोनाकडे झालेले दुर्लक्ष हे होते. त्यानंतर मात्र पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीसचआदिवासींच्या समग्र समस्यांचा सर्वांगीण आढावा घेण्यात आला आणि त्यातूनच आदिवासी उपयोजना किंवा जनजाती उपयोजना या नांवाने परिचित असा हा कार्यक्रम आखण्यात आला व सन १९७६-७७ मध्ये राज्यात हा कार्यक्रम सुरु करण्यात आला. आजतागायत सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी चालू आहे.

आदिवासी उपयोजनेची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१. आदिवासी उपयोजनेअंतर्गत क्षेत्रातील व इतर क्षेत्राच्या विकासातील दरी कमी करणे.

२. आदिवासी समाजाचा दर्जा आणि गुणवत्ता वाढविणे

३. आदिवासीपुढील मुख्य प्रश्न हाताळणे

४. आदिवासींची पिळणूकीपासून मुक्तता करणे, त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाला गती देणे. त्यांच्यातील अंतर्गत बळ वाढविणे आणि त्यांच्यातील संघटनशक्ती वृध्दींगत करणे.

थोडक्यात आदिवासींचा सामाजिक, आर्थिक विकासाचा वेग गतिमान करण्याच्या उद्देशाने शासनाने आदिवासी उपयोजना संकल्पनेचा स्विकार केला आणि आदिवासी उपयोजना अधिक प्रभावी होण्यासाठी

आदिवासी उपयोजनेचा व्यय वाढविणे देखील तितकेच गरजेचे होते व त्यादृष्टीने शासनाकडून जाणीवपूर्वक प्रयत्नही करण्यात आले. राज्याची आदिवासी उपयोजना कार्यान्वित करण्यासाठी सुरवातीस नियोजन विभागातर्फे विभिन्न प्रशासकीय विभागांना व्यय उपलब्ध करून देण्याची पध्दत होती व सदरील पध्दती राज्यात सन १९९२-९३ पर्यंत प्रचलित होती. संबंधित विभाग त्यांच्या स्वेच्छाधिकारात आणि त्यांच्या प्राथम्यक्रम पसंतीनुसार आदिवासी उपयोजनेकरिता व्यय निश्चित करीत असत. आदिवासी उपयोजनेतून बाजूला काढलेल्या निधीतून कोणत्या योजना, कार्यक्रम आणि विकासाची कामे हाती घ्यावयाची याबाबत सुध्दा संबंधित प्रशासकीय विभागच निर्णय घेत असत. आदिवासी क्षेत्रातील योजनांचा तेथील आदिवासींना प्रत्यक्ष लाभ उपलब्ध करून देण्यापेक्षा केवळ सांख्यिकी आकडयांवरच भर देण्यात येत असे. त्यामुळे आदिवासी उपयोजना ही राज्य योजनेचा केवळ एक घटक असल्याची भावना निर्माण झाली. आदिवासी क्षेत्रातील प्रकल्प प्रशासनाच्या सहमतीने योजना कार्यान्वित करण्याचे कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत. सबब, आदिवासी उपयोजना कार्यान्वयनामध्ये काही त्रुटी आणि वैगुण्ये होती. परिणामतः आदिवासी क्षेत्रामध्ये पुरेशा प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली नाही.

आदिवासी उपयोजनेच्या कार्यान्वयनातील वर उल्लेखित त्रुटी आणि वैगुण्ये लक्षात घेता राज्य शासनाने सदर बाब आठव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी राज्य नियोजन मंडळापुढे मांडली. या बाबींचा अभ्यास करण्यासाठी श्री.द.म.सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि राज्याचे माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी, १९९१ मध्ये राज्य नियोजन मंडळाने एक उपसमितीची नियुक्ती केली. या उपसमितीने जून, १९९२ मध्ये सादर केलेल्या अहवालातील शिफारशी राज्य शासनाने स्विकारल्या. या शिफारशींपैकी एका शिफारशीनुसार आता नियोजन विभाग आदिवासी विकास विभागाला आदिवासी उपयोजनेसाठी विवक्षित निधी उपलब्ध करून देतो. या निधीच्या मर्यादेत आदिवासी उपयोजनेला अंतिम रूप देण्याची जबाबदारी आता पूर्वीप्रमाणे प्रशासकीय विभागाकडे नसून ती आदिवासी विकास विभागाकडे आली आहे. आदिवासींना प्रत्यक्ष लाभदायी असलेल्या विभिन्न योजनांवरील व्यय आता आदिवासी विकास विभागामार्फत अंतिमतः निश्चित केला जातो. तसेच आदिवासी विकास विभागातर्फे योजनांची काळजीपूर्वक छाननी करून आदिवासींना लाभदायी न ठरणाऱ्या योजनांवरील भ्रामक व्यय आदिवासी उपयोजनेमध्ये टाळला जातो. उदा. राज्य परिवहन, उच्च दाबाच्या विद्युतवाहीन्या इ. बाबी सद्यस्थितीला (सन १९९६-९७) राज्य योजनांतर्गत एकूण व्ययाच्या ७.४८% इतका व्यय आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सन १९९२-९३ नंतर ज्याप्रमाणे आदिवासी

उपयोजनेसाठी व्यय उपलब्ध करून देण्याच्या पध्दतीत बदल करण्यात आला त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागातही कामकाजाच्या दृष्टीकोनातूनही काही बदल करण्यात आले आहेत.

जानेवारी, १९९२ मध्ये आदिवासी विकास विभागाची पुनर्रचना करण्यात आली त्यानंतर २४ प्रकल्प अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र इतके नेमकेपणाने निशिचत केले गेले की, राज्यातील जवळ जवळ सर्वच आदिवासींचा मग असे आदिवासी 'आयएडीपी' 'माडा' 'मिनी माडा' किंवा राज्यामध्ये अन्यत्र विखुरलेली आदिवासी क्षेत्रे यामधील कोणत्याही ठिकाणचे असोत त्या अधिकार क्षेत्रामध्ये त्यांचा समावेश झाला. प्रकल्प अधिकाऱ्यांचे अधिकार क्षेत्र नेमकेपणाने निश्चित होतानाच त्यांच्या कार्यक्षेत्रातील अन्य विभागाच्या गटस्तरीय यंत्रणेचे पर्यवेक्षण करण्याचे प्रशासनिक नियंत्रण करण्याचे अधिकार मात्र त्यांना नव्हते. म्हणून प्रकल्प पातळीवर जबाबदार ठरू शकेल अशाप्रकारे सेवा व पर्यवेक्षण यांचे यथाायोग्य एकात्मिकरण होण्याच्या दृष्टीने एक उणीव भासत होती. ही उणीव दूर करण्यासाठी शासनाने नोव्हेंबर, ९३ मध्ये अमरावती जिल्हयातील चिखलदरा या अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या क्षेत्रासह एकूण ११ निवडक आय.ए.डी.पी. क्षेत्रातील प्रशासनाचे बळकटीकरण केले. त्यानुसार या आय.ए.डी.पी. क्षेत्रातील अधिकाऱ्यांची नियुक्ती भारतीय प्रशासन सेवेमधून किंवा भारतीय वनसेवेमधून करण्यात येते व त्यांना अपर आयुक्तांचे त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर नियामक व विकास विषयक जबाबदारी टाकण्यात आली आणि मंजुरी विषयक व शिस्ती संबंधीचे सर्व आवश्यक अधिकार त्यांना देण्यात आले.

अशाप्रकारे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासींच्या विकासाच्या योजनांची अधिकाधिक प्रभावी अंमलबजावणी व्हावी तसेच कुपोषण, दैन्य, दारिद्रय व निरक्षरता यांच्यापासून आदिवासींचा बचाव व्हावा या उद्देशाने शासनाने आदिवासी क्षेत्रातील प्रशासनाचे बळकटीकरण केले. तथापि, आदिवासी क्षेत्रातील दुर्गम व संवेदनशील भागात काम करतांना अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना प्राथमिक आरोग्य, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, रस्ते, रेशन दुकान अशासारख्या मुलभूत सुविधा व जीवनावश्यक वस्तूंपासून देखील कर्मचाऱ्यांना वंचित रहावे लागते. यामुळे आदिवासी क्षेत्रातील नियुक्तीच्या ठिकाणी काम करावयास शासकीय अधिकारी, कर्मचारी सहजासहजी तयार होत नाहीत व वारंवार हे कर्मचारी आपआपल्या राहत्या घरी जाण्यासाठी धडपडत असतात. त्यांचेवर मुख्यालयाच्या ठिकाणी थांबण्याची सक्ती केल्यास तसेच जरी ते नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले तरी नाखुषीनेच कामे करीत असतात. नाखुषीने किंवा बळजबरीने केलेल्या कामाचा दर्जा समाधानकारक नसतो.

परिणामत: आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विविध खात्यातील अधिकारी, कर्मचारी यांची पदे रिक्त राहतात. आरोग्य खात्यासारख्या महत्वाच्या खात्यामध्ये देखील अशीच स्थिती असल्याचे दिसते. यामुळे विकासाचा वेग व परिणामकारकता यावर परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले व त्यामुळे शासनाने आदिवासी भागासाठी आरोग्य खात्यामध्ये सुधारणा करून आदिवासी क्षेत्रात आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी तसेच आदिवासी उपयोजन क्षेत्रात अधिकारी/कर्मचारी यांनी स्वखुषीने व हिरीरीने काम करावे यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अडचणींबाबत सखोल विचार करून आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना आर्थिक स्वरूपाचा विशेष लाभ देणे गरजेचे असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले व त्यानुसार सुरूवातीला शासन निर्णय क्रमांक : आस्था-१०९२/प्र.क्र.३०/का-१५, दिनांक २० फेब्रुवारी, १९९२ अन्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष आर्थिक स्वरूपाचा लाभ म्हणून प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला. सदर प्रोत्साहन भत्याचे दरमहा दर पुढील प्रमाणे होते.

| अ.क्र. | वेतनश्रेणी | प्रोत्साहन भत्याचा द.म. दर |
|---|---|---|
| १. | मूळ वेतन रू.९५०/- पेक्षा कमी | रू. २०/- |
| २. | मूळ वेतन रू.९५०/- व अधिक परंतु रू.१५००/- पेक्षा कमी | रू. ४०/- |
| ३. | मूळ वेतन रू.१५००/- व अधिक परंतु रू.२०००/- पेक्षा कमी | रू. ६०/- |
| ४. | मूळ वेतन रू.२०००/- व अधिक परंतु रू.३०००/- पेक्षा कमी | रू. ८०/- |
| ५. | मूळ वेतन रू.३०००/- व त्यापेक्षा अधिक | रू. १००/- |

तथापि वरील प्रमाणे विशेष आर्थिक स्वरूपाचा लाभ दिल्यानंतरही दुर्गम व संवेदनशील भागात वैद्यकीय व इतर अधिकारी रहात नाहीत असे आढळून आल्याने प्रोत्साहन भत्याच्या दरात वाढ होऊन सुधारित दराने प्रोत्साहन भत्ता दिला गेला पाहिजे असे शासनाने ठरविले. त्यानुसार आदिवासी क्षेत्रातील अतिदुर्गम भागातील १३ जिल्हयातील संकुलातील १४७२ गावांत कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १ मे १९९२ पासून शासन निर्णय क्र. आस्था-१०९२/प्रक्र.५८/का-१५, दिनांक २ मे १९९२ अन्वये सुधारित दराने प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला. मात्र शासन आदेश २० फेब्रुवारी, १९९२ मधील शासकीय निवासस्थाने ताब्यात ठेवणेबाबत तसेच शासकीय निवासस्थान उपलब्ध नसल्यास त्या ठिकाणी अनुज्ञेय असलेला

घरभाडे भत्ता घेण्याची सुविधा पूर्वी प्रमाणेच चालू ठेवण्यात आली.

२ मे, १९९२ च्या शासन निर्णयानुसार सुधारित प्रोत्साहन भत्याचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

| वेतनश्रेणी | दरमहा रूपये |
| --- | --- |
| मूळ वेतन रू. ९५०/- पेक्षा कमी | रू. १००/- |
| रू. ९५०/- ते १४९९/- | रू. २००/- |
| रू. १५००/- ते १९९९/- | रू. ३००/- |
| रू. २०००/- ते २९९९/- | रू. ४००/- |
| रू. ३०००/- व अधिक | रू. ५००/- |

सदर सुधारित प्रोत्साहन भत्ता संबंधित शासन निर्णया सोबतच्या यादीतील १४७२ गावांत कार्यरत असणाऱ्या सर्व शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना अनुज्ञेय राहील व तो १ मे, १९९२ पासून अंमलात येईल व आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत अंमलात राहील असेही सदर शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले.

शासन निर्णय क्रमांक आस्था-१०९३/प्र.क्र.२०२/का-१५, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९३ अन्वये आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या प्रकल्प यंत्रणेचे बळकटीकरण करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले. प्रकल्प यंत्रणेचे बळकटीकरण करण्या बरोबरच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जास्तीत जास्त गावातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्याचा लाभ व्हावा हा दृष्टीकोन देखील शासनाने नजरेसमोर ठेवला.

मात्र २ मे, १९९२ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या गावांना प्रोत्साहन भत्ता लागू करताना आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अन्य काही गावात काम करणारे अधिकारी/कर्मचारी या लाभापासून वंचित राहतात असे शासनाच्या निदर्शनास आल्याने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्रोत्साहन भत्यापासून वंचित राहिलेल्या गावांना यात सामावून घेण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे झाले. त्यामुळे शासनाने ९ मार्च, १९९० नुसार घोषित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ६९७५ गावातील/शहरातील कार्यरत असणाऱ्या व तेथे मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णय क्रमांकः १०९३/प्र.क्र. २६१/का-१५, दिनांक २९, डिसेंबर, १९९३ अन्वये दि.२ मे, १९९२ मध्ये नमूद केलेल्या दराप्रमाणेच प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय घेतला.

सदर प्रोत्साहन भत्ता पुढील वर्गातील कर्मचाऱ्यांना देय राहील.

१) अ) सर्व राज्य शासकीय कर्मचारी आणि अधिकारी.

ब) जिल्हा परिषदांचे कर्मचारी आणि अधिकारी.

क) अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळातील पूर्णकालीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

२) सदरहू प्रोत्साहन भत्ता अंशकालीन कर्मचारी व नैमित्तीक कामगार यांना अनुज्ञेय असणार नाही.

३) सदरहू प्रोत्साहन भत्ता दिनांक १-१-९४ पासून देय राहील व आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत म्हणजे ३१ मार्च, १९९७ पर्यंत अंमलात राहील.

४) दिनांक २ मे, १९९२ च्या शासन निर्णयाद्वारे ज्या १४७२ अतिदुर्गम गावात कार्यरत असलेल्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांकरिता प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी जी गावे येथे उल्लेखित (६९७५) आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट नसतील त्या गावातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना वरील दरानेच प्रोत्साहन भत्ता देय राहील. त्यासाठी मुद्दा क्रमांक - १ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले कर्मचारी व अधिकारी पात्र राहतील.

शासन निर्णय क्र. आस्थाा-१०९३/प्र.क्र.२६१/का-१५, दिनांक २८ एप्रिल, १९९४ अन्वये सदरहू प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत थोडी सुधारणा करण्यात आली. वरील शासन आदेशान्वये आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून निर्धारित केलेल्या १४ जिल्ह्यातील एकूण ६९६२ गांवे व १३ शहरे अशा एकूण ६९७५ गावांत कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या कृषि विद्यापीठे व कृषितर विद्यापीठे व त्यांना संलग्न असलेल्या महाविद्यालये यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक २९ डिसेंबर, १९९३ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या दराने दिनांक १ जानेवारी, १९९४ पासून प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात आला. हा प्रोत्साहन भत्ता दिनांक २९ डिसेंबर, १९९३ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या शर्तींना अधीन राहूनच लागू करण्यात आला.

वरीलप्रमाणे प्रोत्साहन भत्याचे बाबतीत वेळोवेळी योग्य त्या सुधारणा शासनाने केल्या व प्रोत्साहन भत्याची व्याप्ती विस्तृत केली. सदरहू प्रोत्साहन भत्ता आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत म्हणजे ३१ मार्च, १९९७ पर्यंत अंमलात राहील असे शासन आदेशात नमूद करण्यात आले. प्रोत्साहन भत्ता पुढे ९ व्या पंचवार्षिक

योजनेत चालू ठेवणे संदर्भात आदिवासी उपयोजना क्षेत्रात मागील कालावधीत प्रोत्साहन भत्यामुळे कोणते बदल घडून आले हे जाणून घेणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील सद्य:स्थितीच्या मुलभूत सोयी, जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता तसेच कार्यालयीन कामकाजात काही फरक झाला किंवा कसे इ. मुद्दांवरही दृष्टीक्षेप टाकणे क्रमप्राप्त आहे. या अनुषंगाने पुढील प्रकरणामध्ये या अभ्यास विषयाची उद्‌दिष्टे देण्यात आली आहेत.

****

## प्रकरण २ रे

# अभ्यास विषयाची उद्दीष्टे, व्याप्ती व सर्वेक्षण पध्दती

सदरील अभ्यास अहवाल करीत असताना खालील उद्दीष्टे नजरेसमोर ठेवण्यात आली होती.

१) प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरच्या कालावधीत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत काय ? याची माहिती घेणे, अशी पदे रिक्त आढळून आल्यास अशी पदे रिक्त का रहातात ? याबाबतची कारणे जाणून घेणे.

२) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापूर्वीच्या वर्षातील (आर्थिक वर्षे सन १९९०-९१ व १९९१-९२) व सदर भत्ता सुरू केल्यानंतरच्या वर्षातील (आर्थिक वर्षे सन १९९१-९३ व १९९३-९४) या कालावधीबाबत आदिवासी विकासाबाबत शासनाच्या विविध खात्यामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांपैकी कांही योजनांची उद्दीष्टे व साध्ये यांची माहिती घेणे व त्याअनुषंगाने तौलानिक दृष्टया मागोवा घेणे.

३) आदिवासी क्षेत्रामध्ये काम करीत असतांना येणाऱ्या अडचणी तसेच क्षेत्रिय पाहणीसाठी निवडलेल्या गावांमध्ये जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता तसेच मूलभूत सुविधा यामध्ये काही बदल झाला आहे काय ? या बाबींवर प्रकाशझोत टाकणे.

४) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांचे प्रोत्साहन भत्त्यांसदर्भातील मत जाणून घेणे.

५) क्षेत्रिय पाहणी तसेच मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रोत्साहन भत्त्यासंदर्भात काही सुधारणा करता येतील का ? याबाबत शिफारंशी करणे.

**क्षेत्रिय पाहणी** -

या नमुना मूल्यमापन अहवालाच्या क्षेत्रिय पहाणीसाठी अहमदनगर, धुळे, नाशिक व ठाणे जिल्हयांची निवड करण्यात आली. सर्वेक्षण कामकाजासाठी उपलब्ध होणारा संस्थेतील कर्मचारीवृंद व इतर बाबी विचारात घेऊन अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्याचा दुर्गम प्रभाग तर धुळे जिल्हयातील नंदूरबार शहर व तत्कालीन नंदूरबार तालुका तसेच नवापूर तालुक्यातील दुर्गम भागाची पाहणी करण्याचे ठरविले. सदर जिल्यांतील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये व इतर कार्यालयांतील कार्यालय प्रमुख / अधिकारी / कर्मचारी यांच्या

मुलाखती घेऊन माहिती संकलित करण्यात आली. त्याचप्रमाणे शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा यांचे मुख्याध्यापकण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून प्रश्नावली तसेच चर्चेच्या स्वरूपात माहिती मिळविण्यात आली.

क्षेत्रिय पहाणीसंदर्भात निवडलेल्या गावांची तसेच कर्मचाऱ्यांची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

**तक्ता**

| अ.क्र. | पाहणीसाठी निवडलेले जिल्हे | पहाणीतील गावांची संख्या | मुलाखती घेतलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | धुळे | ६ | २० |
| २. | अहमदनगर | ८ | २२ |
| ३. | नाशिक | ५ | ५६ |
| ४. | ठाणे | २ | ३१ |
| | एकूण | २१ | १२९ |

तसेच टपाल प्रश्नावलीव्दारे एकूण २१ शासकीय अनुदानित आश्रमशाळा व जिल्हा परिषदांच्या शाळा यांच्या मुख्याध्यापकांकडून माहिती संकलित करण्यात आली.

**संदर्भ वर्ष :**

विविध शासकीय विभागांच्या (उदा. आरोग्य, आदिवासी विकास इ.) क्षेत्रिय योजनांची उद्दिष्टे व साध्ये यांची माहिती मिळविण्यासाठी सन १९९०-९१, ९१-९२ तसेच १९९२-९३, ९३-९४ ही वर्षे संदर्भ वर्षे ठरविण्यात आली

**पहाणीमध्ये भरावयाची प्रपत्रे**

क्षेत्रिय पहाणीमध्ये वेगवेगळया स्तरावरून माहिती मिळविण्यासाठी तीन प्रकारची प्रपत्रे तयार केली.

१) प्रपत्र १ : कार्यान्वयन अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली

सदर प्रश्नावलीमध्ये प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापूर्वी अधिकारी / कर्मचारी यांची पदे रिक्त रहात होती का ? रिक्त रहात असल्यास त्यांची कारणे, प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरची रिक्त पदांबाबतची स्थिती, कामाबाबतची लक्ष्ये व साध्ये इ. माहिती समाविष्ठ करण्यात आली.

**२) प्रपत्र २ : कर्मचाऱ्यांसाठी प्रश्नावली**

या प्रश्नावलीत कर्मचारी काम करीत असलेल्या ठिकाणी उपलब्ध जीवनावश्यक वस्तू, मूलभूत सुविधा प प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवावी किंवा कसे याबाबतचे अभिप्राय व कारणे इ. बाबींचा समावेश करण्यात आला.

**३) प्रपत्र ३ : मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली**

यामध्ये शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांबाबतची माहिती, गावातील उपलब्ध सुविधा, प्रोत्साहन भत्ता लागू केल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये झालेले बदल व प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवावा किंवा कसे याबाबतचे अभिप्राय व कारणे या बाबी अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत.

हा अहवाल तयार करताना आदिवासी विकास, सार्वजनिक बांधकाम, ग्रामीण विकास, आरोग्य इ. विविध शासकीय विभागातील अधिकारी तसेच कर्मचारी यांचेकडून प्रश्नावलीव्दारे तसेच चर्चेतून प्रोत्साहन भत्त्याबाबतची आवश्यक ती माहिती मिळविण्यात आली. त्याचप्रमाणे मुख्याध्यापक, शासकीय अनुदानित आश्रमशाळा यांचेकडूनही प्रश्नावलीव्दारे तसेच प्रत्यक्ष चर्चेतून माहिती संकलित करण्यात आली व सदरहू माहितीचा आधार मूल्यमापन अहवाल तयार करताना घेण्यात आलेला आहे. क्षेत्रिय पहाणीतून मिळालेल्या माहितीचे तक्तीकरण व पृथ:करण करण्यात आले आहे. तसेच कार्यान्वयन अधिकारी यांचेशी केलेल्या चर्चेतून व प्रत्यक्ष पहाणीतील माहिती यावर मुख्यत्वे निष्कर्ष व शिफारंशी आधारलेल्या आहेत.

# प्रकरण ३ रे

## क्षेत्रिय माहितीचे पृथःकरण

आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना त्या भागात काम करतांना आर्थिक लाभ दिल्यास त्यांना त्या भागात काम करण्यास प्रोत्साहन मिळेल व ते चांगल्या प्रकारे काम करू शकतील. म्हणून शासनाने सदरहु क्षेत्रात प्रोत्साहन भत्ता लागू केला. आदिवासी उपयोजना क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारे अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन तसेच निरिक्षणातून व चर्चेव्दारे मिळालेल्या माहितीचे मूल्यमापन अहवालासाठी संकलन करण्यात आले. पाहणीतील संकलीत केलेल्या माहितीचे पृथःकरणे करण्यात आले. ही माहिती तक्ता क्र. ३.१ ते तक्ता क. ३.५ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

## तक्ता क्रमांक ३.१

## शासकीय आश्रमशाळांमधील उत्तीर्ण विद्यार्थींची टक्केवारी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा | शाळाचे नांवे | प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापूर्वीची टक्केवारी | | | | | | प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरची टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९९०-९१ | | | १९९१-९२ | | | १९९२-९३ | | | १९९४-९५ | | |
| | | | इ.४ थी | इ.७ वी | इ.१० वी | इ.४ थी | इ.७ वी | इ.१० वी | इ.४ थी | इ.७ वी | इ.१० वी | इ.४ थी | इ.७ वी | इ.१० वी |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. |
| १. | ठाणे | शा.पो.बे.आश्रमशाळा, देहेरे | ९५ | ६६ | ४३ | ८२ | ८० | १९ | ९३ | ९७ | ७५ | ८५ | ८२ | ७० |
| २. | अमरावती | शा.पो.बे.आश्रमशाळा,राणीगांव | ६७ | ९० | ४ | ७५ | ९४ | ० | ६८ | ९६ | २८ | ७० | ९० | ० |
| | | शा.पो.बे.आश्रमशाळा, सुसर्दा | ८९ | १०० | - | ७६ | ३७ | - | ३३ | ३२ | - | ५५ | ४८ | २० |
| ३. | धुळे | शा.पो.बे.आश्रमशाळा, असली | ९७ | ९५ | - | ८४ | ९१ | - | ९५ | १०० | - | ९७ | १०० | - |
| | | शा.आश्रमशाळा, तोरणमाळ | १०० | १०० | - | ९५ | १०० | - | ९५ | ९० | २३ | ८५ | १०० | ६१ |
| | | शासकीय आश्रमशाळा, यादवड | १०० | १०० | - | १०० | १०० | - | १०० | १०० | - | १०० | १०० | - |
| ४. | गडचिरोली | शासकीय आश्रमशाळा, बंकटापूर | - | - | - | - | - | - | १०० | - | - | १०० | - | - |
| | | शासकीय आश्रमशाळा, सोडे | ९१ | ७९ | - | ९१ | ७९ | - | ८१ | ९३ | - | ९२ | ९३ | - |
| | | पो.बे.आश्रमशाळा, ग्यारापती | ८८ | १०० | - | - | ८८ | - | - | ८८ | - | १०० | १०० | - |
| ५. | अहमदनगर | पो.बे.आश्रमशाळा, पिंपरकणे | ८० | ९५ | - | ९० | ९० | - | ६५ | ८५ | - | ९५ | ८५ | - |
| | | पो.बे.आश्रमशाळा, घाटघर | ९३ | ८२ | - | ८२ | ८६ | - | ८४ | ८३ | - | ८७ | ८७ | - |
| | | पो.बे.आश्रमशाळा, तिरडे | ८० | ७० | - | ८२ | ९४ | - | ७६ | ७५ | - | ७९ | ७७ | - |
| | | पो.बे.आश्रमशाळा, कोहणे | - | - | ३९ | - | - | ५८ | - | - | ८ | - | - | ३० |

तक्ता क्रमांक ३.१ मधील सांख्यिकी माहितीवरून असे निदर्शनास येते की, एकूण १३ शासकीय आश्रमशाळांपैकी ८ शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळा आहेत. पैंकी इयत्ता १० वी चा वर्ग असलेल्या ३ आश्रमशाळा आहेत. प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर वरील ३ आश्रमशाळांपैंकी ठाणे जिल्हयातील एक आश्रमशाळेतील इयत्ता १० वी च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. अमरावती जिल्हयातील शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत फक्त सन १९९२-९३ या वर्षात वाढ झालेली दिसून येते. मात्र नगर जिल्हयातील शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता १० वी च्या निकालाच्या टक्केवारीत प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर घट झालेली दिसून येते.

आश्रमशाळेतील इयत्ता ७ वी च्या निकालाचा विचार केल्यास, प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरच्या दोन वर्षात (म्हणजेच सन १९९२-९३, ९३-९४) एकूण ३ आश्रमशाळेतील इयत्ता ७ वी च्या वर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत वाढ झालेली निदर्शनास येते. उर्वरित शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता ७ वी च्या वर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर काही ठिकाणी वाढ तर काही ठिकाणी घट झाल्याचे आढळून येते.

याचाच अर्थ असा की, सदर आश्रमशाळेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत समानता असल्याचे दिसून येते तर इयत्ता १० वी च्या वर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत तुलनात्मकरित्या वाढ दिसून येते.

## तक्ता क्रमांक ३.२

### अनुदानित आश्रमशाळांमधील उत्तीर्ण विद्यार्थींची टक्केवारी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा | शाळाचे नांवे | प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापूर्वीची टक्केवारी | | | | | | प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरची टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९९०-९१ | | | १९९१-९२ | | | १९९२-९३ | | | १९९४-९५ | | |
| | | | इ.४ थी | इ.७ वी | इ.१० वी | इ.४ थी | इ.७ वी | इ.१० वी | इ.४ थी | इ.७ वी | इ.१० वी | इ.४ थी | इ.७ वी | इ.१० वी |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. |
| १. | अहमदनगर | अनुदानित आश्रमशाळा, शेंडी | - | - | - | - | - | - | - | - | - | ८७ | - | - |
| २. | धुळे | पो.बे.आश्रमशाळा,राजबर्डी | - | - | ६२ | - | - | ६१ | - | - | ७६ | - | - | ६१ |
| ३. | अमरावती | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमशाळा, ओखकर्डी | ७५ | - | - | ६९ | - | - | ९० | - | - | ८२ | ९७ | - |
| | | ज्ञानमंदिर आश्रमशाळा, चाकुर्दा | - | - | - | - | - | - | ६९ | - | - | ५६ | - | - |
| ४. | भंडारा | रविंद्रनाथ टागोर आश्रमशाळा, मेढा | - | - | - | ९३ | - | - | ९३ | - | - | ७८ | - | - |
| ५. | गडचिरोली | अंगतराव आश्रमशाळा, लगाम | - | - | - | - | - | - | ७१ | - | - | ८७ | - | - |
| | | विनोबा आश्रमशाळा, बिनागुंडा | - | - | - | १०० | - | - | १०० | - | - | १०० | - | - |
| | | श्री गुरुदेव पो.आ.आ.शाळा, कमलापूर | १०० | १०० | ६३ | १०० | १०० | ६० | ९३ | १०० | १०० | ५४ | ९७ | ५२ |

तक्ता क्रमांक ३.२ च्या सांख्यिकी माहितीवरून असे निदर्शनास येते की, एकूण ८ अनुदानित आश्रमशाळांपैकी २ आश्रमशााळा इयत्ता १० वी च्या वर्गापर्यंत आहेत. प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरच्या दोन वर्षांपैकी १ वर्षी (सन १९९२-९३ या वर्षात), एका अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता १० वी च्या वर्गातील निकालाच्या टक्केवारीत वाढ झालेली आहे तर उर्वरित एका अनुदानित आश्रमशाळेतील टक्केवारीत काही प्रमाणांत घट झालेली आढळून येते. इयत्ता ७ वी च्या वर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या निकालाच्या टक्केवारीत विशेष बदल झालेला दिसून येत नाही. मात्र इयत्ता ४ थी च्या निकालाच्या टक्केवारीत प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर वाढ झालेली दिसून येते. तथापि काही अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता ४ थी च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत समानता दिसून येते. याचाच अर्थ आदिवासी उपयोजना क्षेत्रात प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरच्या अनुदानित आश्रमशाळांतील निकालाच्या परिस्थितीत लक्षणिय फरक आढळून येत नाही.

## तक्ता क्रमांक ३.३

## जिल्हापरिषद शाळांमधील उत्तीर्ण विद्यार्थींची टक्केवारी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा | शाळाचे नांवे | प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापूर्वीची टक्केवारी | | | | | | प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरची टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९९०-९१ | | | १९९१-९२ | | | १९९२-९३ | | | १९९४-९५ | | |
| | | | इ.४थी | इ.७वी | इ.१०वी | इ.४थी | इ.७वी | इ.१०वी | इ.४थी | इ.७वी | इ.१०वी | इ.४थी | इ.७वी | इ.१०वी |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. |
| १. | धुळे | जि.प.म.शाळा, तारापूर | १०० | - | - | १०० | - | - | १०० | - | - | १०० | - | - |
| | | जि.प.म.शाळा, वडाजाखण | ४० | - | - | ५२ | - | - | ४५ | - | - | ४३ | - | - |
| | | जि.प.म.शाळा, असलीपाडा | ९० | - | - | ९५ | - | - | ९५ | - | - | १०० | - | - |
| | | जि.प.म.शाळा, कोळदे | ६७ | १०० | - | ९३ | ९५ | - | ८६ | १०० | - | ९० | १०० | - |
| २. | नाशिक | जि.प.म.शाळा, कुभाळे | ८४ | ६३ | - | ९० | १०० | - | ८८ | १०० | - | १०० | १०० | - |
| ३. | अहमदनगर | जि.प.म.शाळा, पिंपरकणे | ९० | ९२ | - | ८९ | ९५ | - | ७५ | ९० | - | ८८ | ९५ | - |
| | | जि.प.म.शाळा, देवगांव | ६८ | - | - | ७० | - | - | ७२ | - | - | ८० | - | - |
| | | आदर्श विद्यालय, भंडारदरा | - | १०० | - | - | १०० | - | - | १०० | - | - | १०० | - |

तक्ता क्रमांक ३.३ चे अवलोकन केले असता असे आढळून येते की, सर्व्हेक्षण केलेल्या ३ जिल्हयांतील एकूण ७ जिल्हा परिषदांच्या शाळा असून ३ शाळा इयत्ता ७ वी पर्यंत आहे तर उर्वरित ४ शाळा इयत्ता ४ थी पर्यंतच्या आहेत व एक आदर्श विद्यालय, भंडारदरा नगर जिल्हयातील असून तेथेही इयत्ता ७ वी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. उपरोक्त तक्त्यानुसार ३ पैंकी २ शाळांतील इयत्ता ७ वी तील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर वाढ झाल्याचे निदर्शनास येते तर एका जिल्हा परिषद शाळेतील निकालात थोडयाफार फरकाने समानता असल्याचे दिसून येते.

उर्वरित ४ जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता ४ थी च्या वर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत काही ठिकाणी वाढ झालेली दिसून येते तर काही ठिकाणी त्यात समानता आढळून येते. मात्र नंतर येथील इयत्ता ७ वी चा निकाल सन १९९०-९१ ते सन १९९३-९४ पर्यंत १०० टक्के एवढा लागलेला दिसून येतो. हयात समानता आढळून येते.

## तक्ता क्रमांक ३.४

## शासकीय कार्यालयातील कामकाजाची उदिष्टये दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | योजनेचे नांव | प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापूर्वीचा कामकाजाचा आढावा | | | | प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरचा कामकाजाचा आढावा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आर्थिक वर्ष | उदिष्टये | साध्ये | टक्केवारी | आर्थिक वर्ष | उदिष्टये | साध्ये | टक्केवारी |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
| १. | प्राथमिक आरोग्य केंद्र, खांडबारा, ता.नवापूर, जि.धुळे | शस्त्रक्रिया | १९९०-९१ | १९१ | २२७ | १०० | १९९२-९३ | २२३ | ३२३ | १०० |
| | | तांबी | | १८७ | ९७ | | | २२६ | १०३ | |
| | | ओरल पिल्स | | १७८ | १९२ | १०० | | १८७ | १८८ | १०० |
| | | निरोध | | २५६३२ | २८७७० | १०० | | ३०४५६ | ४०३९६ | १०० |
| | | शस्त्रक्रिया | १९९१-९२ | २५० | २७४ | १०० | १९९३-९४ | २०० | २३८ | १०० |
| | | तांबी | | १८० | १३६ | | | १८७ | १०६ | |
| | | ओरल पिल्स | | १३९ | १४६ | १०० | | १६७ | २१८ | १०० |
| | | निरोध | | २६९२८ | ३२३०६ | १०० | | ३६००० | ४०५४२ | १०० |
| २. | जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, नंदूरबार, जि.धुळे | जवाहर रोजगार योजना | १९९०-९१ | १०० | | १०० | १९९२-९३ | १०० | | १०० |

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | योजनेचे नांव | प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापूर्वीचा कामकाजाचा आढावा | | | | प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरचा कामकाजाचा आढावा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आर्थिक वर्ष | उदिष्टये | साध्ये | टक्केवारी | आर्थिक वर्ष | उदिष्टये | साध्ये | टक्केवारी |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
| ३. | वनक्षेत्रपाल यांचे कार्यालय, | वनीकरण | १९९०-९१ | ५०७.५ हे. | ५०७.५ हे. | १०० | १९९२-९३ | ११६८ हे. | ११६८ हे. | १०० |
| | राजूर, जि.अहमदनगर | वनीकरण | १९९१-९२ | ७१५ हे. | ७१५ हे. | १०० | १९९३-९४ | ६१९ हे. | ६१९ हे. | १०० |
| ४. | उप वनसंरक्षक, जव्हार वनविभाग | वनीकरण | १९९०-९१ | - | - | - | १९९२-९३ | ५६० हे. | ५६० हे. | १०० |
| | जव्हार, जि.ठाणे | वनीकरण | - | - | - | - | १९९३-९४ | १७८ हे. | १७८ हे. | १०० |
| ५. | पशुधन विकास अधिकारी, | वळू विकास योजना | १९९०-९१ | ४ | ४ | १०० | १९९२-९३ | ४ | ४ | १०० |
| | मोखाडा, जि.ठाणे | | १९९१-९२ | ४ | ४ | १०० | १९९३-९४ | ४ | ४ | १०० |
| ६. | उप अभियंता, उपविभाग, | कोटा बंधारे, विहिरी | १९९०-९१ | १०० | ६५ | ६५ | १९९२-९३ | १०० | ७० | ७० |
| | इगतपूरी | जीवनधारा, जवाहर, | १९९१-९२ | १०० | ७० | ७० | १९९३-९४ | १०० | ७५ | ७५ |
| ७. | लागवड अधिकारी, सामाजिक | आदिवासी विकास, | १९९०-९१ | ३० | ३० | १०० | १९९२-९३ | १०० | ७० | ७० |
| | वनीकरण, इबतपूरी, जि.नाशिक | पाटबंधारे विकास | | ४९-२० | ४९-२० | १०० | | | | |
| | | रोजगार हमी योजना, | १९९१-९२ | २० | २० | १०० | १९९३-९४ | २१ | २१ | ७५ |
| | | पाटबंधारे विकास योजना | | ९४ | ९४ | १०० | | ८ | ८ | |

तक्ता क्रमांक ३.४ मधील सांख्यिकी माहितीवरून असे दिसून येते की, धुळे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र, खांडदारा येथील कामकाज हे उद्दीष्टानुसार (१००%) पूर्ण झालेले आहे. म्हणजेच आदिवासी क्षेत्रात प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापूर्वी व नंतरच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामकाजातील परिस्थितीत विशेष वाढ किंवा घट झालेली दिसून येत नाही. तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभाग, पंचायत समिती, नंदूरबार, जि. धुळे या कार्यालयाचे जवाहर रोजगार योजनेचे काम देखिल उद्दीष्टांप्रमाणे पूर्ण झालेले आहे व वनक्षेत्रपाल राजूर, जि. अहमदनगर या कार्यालयातील देखिल १००% उद्दीष्टांनुसार कामकाज पूर्ण झालेले आहे.

म्हणजेच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील उपरोक्त कार्यालयातील कामकाजातील प्रोत्साहन भत्ता पूर्वीच्या व नंतरच्या परिस्थितीत समानता असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ३.५**

**प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतरची रिक्त पदांची माहिती दर्शक तक्ता**

| अ.क्र. | शाळेचे / कार्यालयाचे नांव | जिल्हा | शाळा / कार्यालयाची संख्या | रिक्त पदे | | एकूण रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्ग ३ | वर्ग ४ | |
| १. | शासकीय आश्रमशाळा | ठाणे | १ | ३ | - | ३ |
| | | अमरावती | २ | ४ | १ | ५ |
| | | धुळे | ३ | ४ | १ | ५ |
| | | गडचिरोली | ३ | ७ | ४ | ११ |
| | | अहमदनगर | ५ | ८ | ९ | १७ |
| | | एकूण | १४ | २६ | १५ | ४१ |
| २. | अनुदानित आश्रमशाळा | अमरावती | २ | २ | १ | ३ |
| | | धुळे | १ | - | - | - |
| | | गडचिरोली | ३ | २ | १ | ३ |
| | | अहमदनगर | १ | - | - | - |
| | | भंडारा | २ | ३ | १ | ४ |
| एकूण | | | ९ | ७ | ३ | १० |

| अ.क्र. | शाळेचे / कार्यालयाचे नांव | जिल्हा | शाळा / कार्यालयाची | रिक्त पदे | | एकूण रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | वर्ग ३ | वर्ग ४ | |
| ३. | जिल्हा परिषद शाळा | धुळे | ४ | २ | - | २ |
| | | अहमदनगर | २ | - | - | - |
| | | नाशिक | १ | १ | - | १ |
| | | एकूण | ७ | ३ | - | ३ |
| ४. | आदर्श आश्रमशाळा | अहमदनगर | १ | - | - | - |
| ५. | प्राथमिक आरोग्य केंद्र, खांडबारा | धुळे | १ | - | - | - |
| ६. | पंचायत समिती सार्वजनिक बांधकाम, नंदूरबार | धुळे | १ | - | - | - |
| ७. | वनक्षेत्रपरी अधिकारी, राजूर | अहमदनगर | १ | - | - | - |
| एकूण | | | | - | - | - |

तक्ता क्रमांक ३.५ मधील माहितीवरून असे आढळून येते की, आदिवासी उपयोजना क्षेत्रात प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर ठाणे, अमरावती, धुळे, गडचिरोली व अहमदनगर या ५ जिल्हयांमधील एकूण १४ शासकीय आश्रमशाळांमध्ये वर्ग ३ व वर्ग ४ ची अनुक्रमे २६ व १५ अशी एकूण ४१ पदे रिक्त आहेत. त्यातील सर्वात जास्त म्हणजे एकूण १७ पदे नगर जिल्हयातील शासकीय आश्रमशाळात रिक्त असल्याचे दिसते. तर सर्वात कमी म्हणजे ३ पदे ठाणे जिल्हयातील शासकीय आश्रमशाळांमध्ये रिक्त असल्याचे दिसून येते. अनुदानित आश्रमशाळांच्या सांख्यिकी माहितीचे अवलोकन केल्यास एकूण ९ अनुदानित आश्रमशाळांमध्ये वर्ग ३ व वर्ग ४ ची अनुक्रमे ७ व ३ अशी १० पदे रिक्त असल्याचे आढळून येते. त्यातील सर्वात जास्त म्हणजे ४ पदे भंडारा जिल्यातील अनुदानित आश्रमशाळांमध्ये रिक्त आहेत तर त्याखालोखाल अमरावती, गडचिरोली जिल्हयांतील अनुदानित आश्रमशाळांमध्ये म्हणजे प्रत्येकी ३ पदे रिक्त आहेत.

जिल्हा परिषदेच्या एकूण ७ शाळांमध्ये फक्त ३ पदे रिक्त असल्याचे दिसून येते.

आदर्श आश्रमशाळा भंडारदरा व इतर सर्व्हे केलेली शासकीय कार्यालयात उदा. प्राथमिक आरोग्य केंद्र, सार्वजनिक बांधकाम व वनक्षेत्रपरि अधिकारी कार्यालय इ. यांत प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर एकही पद रिक्त नसल्याचे आढळून आले.

तुलनात्मकदृष्टया विचार केला असता शासकीय आश्रमशाळांमध्ये कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांची संख्या सर्वाधिक आहे तर जिल्हा परिषदेतील शाळांमध्ये हेच प्रमाण सर्वात कमी असल्याचे दिसून येते. शासकीय आश्रमशाळांमधील रिक्त पदांची कारणे जाणून घेणयाचा प्रयत्न केला असता असे समजले की, कांही कारणास्तव शिक्षकांची दिलेले राजीनामे, शिक्षकांच्या बदल्या, पदोन्नती व इतर कांही कारणांमुळे सदरची पदे रिक्त राहतात.

आरोग्य विभागाही पूर्वी अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदे रिक्त रहात होती. तथापि अलीकडील काळांत शासनाने योजलेल्या विविध उपाययोजना, काही प्रमाणांत कर्मचाऱ्यांना होणारा आर्थिक फायदा इ. कारणांमुळे आरोग्य विभागमधील रिक्त पदांच्या संख्येत लक्षणीय घट होत असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेतून समजले.

## प्रकरण ४ थे

# सूचना तथा शिफारशी

आदिवासी क्षेत्रामध्ये सेवेसाठी शासकीय वा निमशासकीय अधिकारी/कर्मचारी यांना प्रवृत्त करणारा तसेच अशा दुर्गम भागामध्ये सेवा करीत असताना त्यांना वैयक्तिक जीवनामध्ये येत असलेल्या अडचणीवर आर्थिकदृष्ट्या मात करावयास पूरक ठरणारा प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवावा किंवा कसे ? तसेच आदिवासी भागातील कोणत्या प्रभागामध्ये असा प्रोत्साहन भत्ता अपेक्षित फलश्रुती मिळण्याच्या दृष्टीने पुढे चालू ठेवणे योग्य राहील ? सदर भत्ता कोणते अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या कामकाजामध्ये प्रोत्साहित करण्यास परिणामकारक ठरत नाही ही बाब देखील विचारात घेऊन क्षेत्रीय पाहणीवर आधारीत खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात येत आहे.

**१) प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवण्याबाबत :-**

आदिवासी क्षेत्रातील दुर्गम अशा प्रभागामध्ये सेवा करीत असताना शासकीय व निमशासकीय अधिकारी/कर्मचारी यांना बऱ्याच मूलभूत सुविधा अभावी येणाऱ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. उदा.दळणवळणविषयक समस्या, उन्हाळ्याच्या काळातील पिण्याच्या पाण्याची समस्या, पावसाळ्याच्या काळामध्ये नद्यांच्या पुरामुळे गांवाचा संपर्क तुटणे अशा प्रकारच्या अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. तसेच अशा क्षेत्रामध्ये सहकुटुंब वास्तव्य करीत असताना त्यांच्या मुलांना उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी तालुका वा जिल्हा स्तरावर पाठविणे, वाहतूक व्यवस्था नसणे, औषधपाणी विषयक गरजांची पूर्ती करण्यासाठी तालुका वा जिल्हा स्तरावर जाणे, अशा अनेक बाबींवर दुर्गम क्षेत्रात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांस जास्तीचा खर्च सहन करावा लागतो. अशा प्रकारे एकीकडे सेवा करीत असताना समस्यांना तोंड देणे तर दुसरीकडे खाजगी जीवनामध्ये दुर्गमतेच्या अडचणीवर मात करुन जादा खर्च करावा लागणे, या बाबी लक्षात घेता आदिवासी क्षेत्रातील दुर्गम अशा परिसरात कार्यरत असलेल्या अधिकारी तसेच कर्मचारी यांना विशेष आर्थिक लाभ म्हणून प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवणे उचितच आहे, असे वाटते.

**२) आदिवासी क्षेत्रातील काही प्रभागांसाठी प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवण्यास फेरविचार घेणेबाबत :**

आदिवासी भागातील तालुक्याच्या ठिकाणी (अपवादात्मक अति दुर्गम व दुर्गम तालुक्यांची ठिकाणे वगळता) सेवा करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत फेरविचार करण्यात यावा, असे

वाटते. कारण अशी ठिकाणे जरी आदिवासी भागामध्ये समाविष्ट असली तरी तशा ठिकाणी सेवा करीत असताना दुर्गमतेच्या अडचणींना सामोरे जावे लागत नाही. तसेच अशा ठिकाणी बिगर आदिवासी क्षेत्रातील सुविधांप्रमाणे सर्व सुविधा उपलब्ध असतात. त्यामुळे तेथील अधिकारी/कर्मचारी यांना वास्तव्याच्या अनुषंगाने अडचणी येत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता पुढे पुढे चालू ठेवणेबाबत फेरविचार व्हावा.

उदा.धुळे जिल्हयातील नंदूरबार या तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध सुविधा लक्षात धेता तेथे प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवण्याबाबत फेरविचार व्हावा तर अक्राणी हे तालुक्याचे ठिकाण असूनही प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवणे योग्य राहील, असे वाटते.

३) आदिवासी क्षेत्रामध्ये नियुक्त होणारे अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्य करावे या दृष्टीने त्यांना प्रेरित करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.आस्था-१०९७/प्रक्र१८/का.१५, दिनांक १४ ऑगस्ट,१९९७ अन्वये प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवण्यात आलेला आहे. तथापि, काही शासकीय तसेच निमशासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेबाबत मुख्यालयाच्या ठिकाणीच त्यांचे मूळ वास्तव्याचे ठिकाण असते. (कर्मचारी मूलतः ज्या गांवातील/शहरातील असतो त्याच गांवामध्ये /शहरांमध्ये सेवेत कार्यरत असतो.)

अशा स्वरुपाच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत देखील प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवणे संदर्भात फेरविचार करण्यात यावा, असे वाटते. कारण असे कर्मचारी आदिवासी भागामध्ये सेवेसाठी गेल्याने तेथील मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्य करीत नसतात तर ते पूर्वीपासून तेथेच राहणारे असतात व आदिवासी भागामध्ये सेवा करीत असताना मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्य करणे संदर्भात वेगळे काहीही केलेले नसते.

४) शासकीय सेवेसंदर्भात अधिकारी किंवा वरिष्ठ अधिकारी यांचे बाबतीत सेवेमध्ये प्रवेश करीत असताना संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी राज्यामध्ये कोठेही सेवा करण्याबाबत संमती दिलेली असते. तेव्हा अशा स्वरुपाचे अधिकारी/कर्मचारी यांना ते आदिवासी भागामध्ये सेवेसाठी गेल्याबद्दल त्यांचा प्रोत्साहन भत्ता म्हणून अतिरिक्त मोबदला देणे उचित राहिल किंवा कसे या अनुषंगाने फेरविचार व्हावा, असे वाटते.

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
## आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांना देणयात येणा-या प्रोत्साहन भत्याबाबतचा मूल्याकंन अहवाल

### प्रपत्र क्र.१

### कार्यालयीन अधिका-यांसाठी प्रश्नावली

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयीन अधिका-यांचे नांव | | |
| २. | हुद्दा | | |
| ३. | कार्यालयाचे नांव व पत्ता | | |
| ४. | प्रोत्साहन भत्ता लागू होण्यापुर्वी (१९९०-९१ व १९९२-९३) आपल्या कार्यक्षेत्रातील अधिकारी-कर्मचा-यांची पदे रिक्त राहत होती काय? | | होय/नाही |
| ५. | पदे रिक्त राहत असल्यास कारणे | १.<br>२.<br>३. | |
| ६. | प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर (१९९३ ते १९९७) आपल्या कार्यक्षेत्रातील पदे रिक्त राहत आहेत किंवा कसे? व किती? सद्यस्थितीबाबत स्वतंत्र तक्त्यात माहिती द्यावी. | | |
| ७. | पूर्वीच्या व सध्याच्या रिक्त पदांच्या प्रमाणांत काही फरक झाला काय? | | होय/नाही |
| ८. | असल्यास कोणता फरक झाला? रिक्त पदांचे प्रमाण वाढले की कमी झाले? | | |
| ९. | प्रोत्साहन भत्ता लागू झाल्यानंतर देखील पदे रिक्त राहत असल्यास आपल्या मते सर्वसाधारण करणे कोणती ? | १.<br>२.<br>३.<br>४.<br>५. | |
| १०. | आपल्या कार्यक्षेत्रातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध आहेत काय ? | होय/नाही | |

११. नसल्यास भाड्याची घरे उपलब्ध होतात काय ? होय/नाही

१२. कामाबाबत उदिष्टय असल्यास

कार्यालयाच्या योजना, लक्ष्ये व साध्ये यांच्या माहितीबाबत.

| आर्थिक वर्ष | योजनेचे नांव | उदिष्टये (न) | साध्य (न) | लक्ष्यांक (न) | साध्य (न) |
|---|---|---|---|---|---|
| १९९०-९१ | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |
| १९९१-९२ | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |
| १९९२-९३ | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |
| १९९३-९४ | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |

१३. आपण काम करी असलेल्या भागात/गांवात सद्यस्थितीला अधिकारी/कर्मचाऱ्यांना मूलभूत सुविधा (दळणवळण, वीज, इ.) व जीवनाश्यक वस्तु (घरे पाणी वगैरे) इ.सहजासहजी उपलब्ध होतात काय ? होय/नाही

१४. प्रोत्साहन भत्ता लागू केल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत, उपस्थितीत तसेच विविध योजनांच्या अंमलबजावणीत नेमका कोणता फरक वा बदल घडून आला असे आपणास वाटते

१५. प्रोत्साहन भत्ता भविष्यात चालू ठेवावा किंवा कसे याबाबत आपले अभिप्राय व कारणे

१६. सद्यस्थितीला मुख्यालयी वास्तव्य आहे किंवा कसे ? मुख्यालयी वास्तव्य आहे/नाही

१७. नसल्यास कारणे/अडचणी कोणत्या ?

ठिकाण

दिनांक

कार्यालयीन अधिकाऱ्यांची स्वाक्षरी

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
# आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांना देणयात येणा-या प्रोत्साहन भत्याबाबतचा मूल्यांकन अहवाल

## प्रपत्र क्र.२

## कार्यालयीन अधिका-यांसाठी प्रश्नावली

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कर्मचाऱ्यांचे नांव | | |
| २. | हुद्दा | | |
| ३. | कार्यालयाचे नांव व पत्ता | | |
| ४. | आदिवासी उपयोजना क्षेत्रात किती वर्षापासून काम करीत आहात ? | | |
| ५. | आपण काम करीत असलेल्या ठिकाणी सघस्थितीला मूलभूत सुविधा (दळणवळण, वीज इ.) तसेच जीवनाश्यक वस्तु (घरे, पाणी वगैरे) सहजासहजी उपलब्ध होतात काय ? | | होय/नाही |
| ६. | नसल्यास कोणत्या सुविधा उपलब्ध होत नाहीत व त्यासाठी पर्यायी व्यवस्था कोणती केली जाते ? | १.<br>२.<br>३.<br>४. | |
| ७. | दळणवळणाची समस्या असल्यास वाहनभत्ता दिला जातो काय ? किती ? | | होय/नाही |
| ८. | आदिवासी क्षेत्रात काम करताना काही अडचणी येतात काय ? | | होय/नाही |
| ९. | अडचणी येत असल्यास कोणत्या ? | १.<br>२.<br>३.<br>४. | |
| १०. | अडचणी दूर करण्यासाठी काय करावे असे आपणास वाटते | | |
| ११. | प्रोत्साहन भत्ता भविष्यात चालू ठेवावा किंवा नाही याबाबत आपले अभिप्राय | | |

| | | |
|---|---|---|
| १२. | प्रोत्साहन भत्ता पुढे चालू ठेवावा किंवा ठेवू नये याबाबतची कारणे | |
| १३. | प्रोत्साहन भत्ता मंजूर होण्यापूर्वी मुख्यालयी वास्तव्य होते काय ? | होय/नाही |
| १४. | नसल्यास, त्याबाबत कोणत्या स्वरुपाच्या अडचणी येत होत्या | १. मुख्यालयी शासकीय निवासस्थाने नाहीत<br>२. भाड्याची घरे मिळत नाहीत.<br>३. गांवात वीजेची व पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय नाही<br>४. दवाखाने नाहीत |
| १५. | सद्यस्थितीला मुख्यालयी वास्तव्य आहे किंवा नाही | मुख्यालयी वास्तव आहे/नाही |
| १६. | नसल्यास त्याची कारणे | |

ठिकाण

स्वाक्षरी